# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ
कृषि नगर, वसमत रोड,
परभणी– ४३१ ४०२ (महाराष्ट्र)

ई-मेलः reg_mau@rediffmail.com
वेबसाईटः www.vnmkv.ac.in
दूरध्वनी:(०२४५२)२२९७५५
फॅक्सः (०२४५२)२२९७५५, २२३५८२


जा.क्र.अेअे-२/विमकअ/२०१९
दिनांकः १५/०७/२०१९

## परीपत्रक

**विषयः-विद्यापीठ प्रक्षेत्रावरील व कार्यालयीन तात्पुरत्या स्वरुपात रोजंदारी तत्वावर अतिरीक्त हंगामी कामे बाह्य यंत्रणेव्दारे (कंत्राटदारा मार्फत) करणे बाबत.**

विद्यापीठ प्रक्षेत्रावरील व कार्यालयीन अतिरीक्त हंगामी कामे नियमित कर्मच्याऱ्यांची उपलब्धता कमी असल्यामुळे आवश्यक व निधीच्या उपलब्धतेनुसार सुरळीत होण्याच्या दृष्टीने बाहय यंत्रणेव्दारे कंत्राटी पध्दतीने उपलब्ध करुन देण्याबाबत परीपत्रक निर्गमीत केलेले आहे. त्यात प्रकल्पग्रस्तांना व सन २००१ मध्ये कमी केलेल्या मजुरांनाच कामे उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले आहे. परंतु प्रकरणी असे निदर्शनास आले आहे की, जे प्रकल्पग्रस्त नाहीत व सन २००१ मध्ये कमी केलेले नाहीत त्यांना विविध विभाग/योजनेमध्ये कामे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. त्यामुळे मुळ प्रकल्पग्रस्त व २००१ मध्ये कमी केलेल्या व्यक्ती सतत या कार्यालयामध्ये पत्रव्यवहार करतात. तसेच वेळोवेळी निदर्शने करणे, उपोषण करणे इ. कृत्ये करतात. सदर मनुष्यबळाचे व्यवस्थापन न झाल्याने प्रशासनाची मोठ्या प्रमाणावर शक्ती वाया जात असून वेळेचाही अपव्यय होत आहे.

सबब उपरोक्त सर्व पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे सूचित करण्यात येत आहे.

१) विविध विभाग/ योजनेंतर्गत कंत्राटदाराकडुन पुरविण्यात आलेल्या व्यक्तींची ते प्रकल्पग्रस्त / सन २००१ मध्ये कमी केलेले असल्याची सर्व प्रभारी अधिकाऱ्यांनी खात्री करावी. यासाठी संबंधीत व्यक्तीचे आधारकार्ड / बँक पासबुक व प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र /२००१ मध्ये कामावरुन कमी केल्याच्या पुराव्याचा अधार घ्यावा. याबाबत संबंधित कंत्राटदारांनाही याची पूर्तता करण्यास सूचित करावे.

२) विद्यापीठांतर्गत कंत्राटदारांना मजूरांचे किंवा पहारेकऱ्यांचे काम देवू नये .

३) ज्या कार्यालय/विभाग/योजनेमध्ये नियमित व कायम पहारेकरी आहेत त्यांनी कोणत्याही परिस्थितीत कंत्राटी तत्वावर पहारेकऱ्याची सेवा घेवू नये. केवळ ज्या कार्यालय / विभाग / योजनेमध्ये नियमित व कायम पहारेकरी नाहीत अशा यंत्रणांनीच जास्तीत जास्त दोन पहारेकऱ्यांच्या कंत्राटी तत्वावर सेवा घ्याव्यात.

४) विद्यापीठांतर्गत / अन्य यंत्रणांकडील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना कंत्राटी तत्वावर नियुक्ती देऊ नये.

५) कार्यालय/विभाग/योजनेमधील साहित्य/धान्य/खते/औजारे इ. चोरी झाल्यास त्याची जबाबदारी संबंधीत पहारेकऱ्याची राहील.

सर्व प्रभारी अधिकारी यांनी सदर परिपत्रकातील उपरोक्त सूचना सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणाव्यात व त्याप्रमाणे आवश्यक त्या कागदपत्राची पडताळणी करुन प्रकल्पग्रस्त / सन २००१ मध्ये कमी केलेल्या व्यक्तींच्या सेवा कंत्राटदारामार्फत द्याव्यात. अपात्र व्यक्तींच्या सेवा घेवू नयेत. अगदी अपवादात्मक परिस्थितीत काही अडचणी उद्‌भवल्यास या कार्यालयास संपर्क साधावा. तसेच मा.कुलगुरु व कुलसचिव हे भेटी देउन सदर परिपत्रकाची अमलबजावणी होते किंवा नाही याबाबत खात्री करतील. तसेच कंत्राटदाराच्या अधिनिस्त जे मजूर कामे करतात त्यांना कंत्राटदारानी त्यांच्या स्वाक्षरीने ओळखपत्र देण्यात यावे.

प्रस्तुत परिपत्रकातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी संबंधित प्रभारी अधिकाऱ्यांची राहील. प्रकरणी होणाऱ्या अनियमिततेस संबंधित प्रभारी अधिकारी व्यक्तीशः जबाबदार राहतील व परिणामतः ते म.ना.से. (शिस्त व अपील) नियम १९७९ अंतर्गत करवाईस पात्र राहतील, याची गांभीर्याने नोद घ्यावी.

**मा.कुलगुरु यांच्या मान्यतेने.**

(रणजीत आ.पाटील)
कुलसचिव

प्रतिलीपीः-संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि)/संचालक संशोधन/संचालक विस्तार शिक्षण, वनामकृवि, परभणी.यांना माहीतीस्तव.

प्रतः- १. प्रभारी अधिकारी ------------------------------------------------------- वनामकृवि, परभणी यांना माहीतीस्तव व कार्यवाहीस्तव.

२.मा.कुलगुरु, यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी यांना माहीतीस्तव.

३.जिल्हा सरकारी कामगार अधिकारी, परभणी यांना माहीतीस्तव.